## जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

**फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११**

**Email ID:-**sp.jalgaon@mahapolice.gov.in


# -:प्रेस नोट :-

दिनांक :- ०९/०५/२०२६

# " नशिराबाद पोलीसांची उल्लेखनिय कामगिरी "

## एका आरोपीताला अटक करत एकुण ३० किलो गोवंश सदृश्य मांस केले जप्त

दिनांक ०८/०५/२२६ रोजी सकळी ०५:४५ वाजेच्या सुमारास सपोनि/योगिता नारखेडे यांना गुप्त बातमीदार यांचेकडून नशिराबाद गावातील मणियार मोहल्ला परिसरात एक इसम हा गोवंश सदृश्य जनावरांची मांसची विक्री करीत आहे अशी खात्रीदायक माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीची पडताळणी करत सहाय्यक पोलीस निरीक्षक/योगिता नारखेडे यांनी आपले पथकासह सदर ठिकाणी अचानक जावुन छापा टाकत आरोपीत नामे मुस्ताक शेख मुसा कुरेशी वय ४६ वर्षे रा. रहेमतपुरा, नशिराबाद ता. जि. जळगाव याला ताब्यात घेतले. सदर इसमाचे ताब्यात खालील प्रमाणे मुद्देमाल मिळून आला.

१) **६,०००/- रु किंमतीचे ३० किलो वजनाचे गोवंश सदृश्य मांस**
२) **३०,०००/- रु किंमतीचे गुन्हयात वापरलेली हिरो कंपनीची फॅशन मोटर सायकल क्र. MH-१९-BC-७०९५**
३) **००.००/- रु किंमतीचा एक लोखंडी कोयता**

---

**असा एकुण ३६,०००/- किंमतीचा मुद्देमाल**

वरील ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाविरुध्द पोकॉ/२१२१ सागर बिडे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने, नशिराबाद पोलीस स्टेशन येथे सदर बाबत गुन्हा रजि. क्र. १५३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम २७४, ३२५ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम कलम ५, ५सी, ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, सदर गुन्हयांचा पुढील तपास पोहेकॉ/२०९६ प्रशांत विरणारे नेमणुक- नशिराबाद पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

**सदरची कामगिरी मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव तसेच श्री. केदार बारबोले, उप विभागीय पोलीस अधिकारी, भुसावळ विभाग, भुसावळ यांच्या मार्गदर्शनाखाली नशिराबाद पोलीस स्टेशनचे प्रभारी श्रीमती योगिता नारखेडे, सहा. पोलीस निरीक्षक नेतृत्वाखाली पोहेकॉ/१९ चंद्रकांत पाटील, पोहेकॉ/२८२५ रितेश चौधरी, पोहेकॉ/२०२५ गुणवंत देशमुख, पोकॉ/४२४ प्रविण लोहार, पोकॉ/२११ विजय अहिरे, पोकॉ/२१२१ सागर बिडे या पथकाने उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव.**

**प्रति,**

**सर्व संपादक/वार्ताहर**
**सर्व प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिकप्रिंटमिडीया**
**२/- जनहितार्थ प्रसारण करीता**

*******************************************************************************************